डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद संलग्नित

व

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

## श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग

# वार्षिक अहवाल

## २०१९-२०२०

कार्यक्रमाधिकारी

डॉ. कल्याणकर पी.एम.

प्राचार्य

डॉ. एम.आर. टकले

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

## श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग

# वार्षिक अहवाल

## २०१९-२०२०

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| | मराठीतील अहवाल |
| १ | महाविद्यालय स्तरावरील उपक्रम |
| २ | समाज स्तरावरील उपक्रम |
| ३ | विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा |
| ४ | स्वयंनिर्वाही प्रमाणपत्र अध्यासक्रम |
| ५ | इंग्रजीतील अहवाल |
| ६ | फोटो अहवाल |
| ७ | वर्तमानपत्रातील प्रसिद्धी |
| ८ | निमंत्रण पत्रिका (विद्यार्थी समुपदेशन व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा) |

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संचलित

व

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

## श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग

# वार्षिक अहवाल

## २०१९-२०२०

महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाने शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये विविध उपक्रम राबविले. विभागाने वर्षभरात महाविद्यालयस्तरावर, समाजस्तरावर उपक्रम राबविले, तसेच विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन केले. त्याचप्रमाणे विभागाने विक्री प्रतिनिधी या स्वयंनिर्वाही प्रमाणपत्र अभ्यासक्रमसुद्धा चालविला. त्याचा सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे -

### १. महाविद्यालय स्तरावरील उपक्रम

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने महाविद्यालय स्तरावर पुढील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

### १.१ मराठवाड्यातील दुष्काळ या विषयावर व्याख्यान :

विभागाच्या वतीने दि. २३ ऑगस्ट २०१९ रोजी विद्यापीठ वर्धापन दिनाचे औचित्य साधून "मराठवाड्यातील दुष्काळ" या विषयावर डॉ. सचिन मोरे (राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री) यांच्या व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते म्हणाले की, दुष्काळाचे दोन प्रकार आहेत. एक म्हणजे ओला दुष्काळ व दुसरा म्हणजे कोरडा दुष्काळ. मराठवाड्याला प्रामुख्याने कोरड्या दुष्काळाला सामोरे जावे लागते. मराठवाड्यातील दुष्काळाला प्रामुख्याने भौगोलिक परिस्थिती जबाबदार आहे. मराठवाड्याकडे मौसमी वारे येताना प्रामुख्याने कोरड्या स्वरूपाचे येतात. वाऱ्यांच्या मार्गामध्ये सह्याद्रीच्या मोठ्या रांगा आल्याने मराठवाड्यात जास्त पाऊस पडत नाही. त्यामुळे येथील बहुतांश शेती कोरडवाहू आहे.

या दुष्काळाला सामोरे जाण्यासाठी मराठवाड्यातील लोकांनी शेतीपूरक व्यवसाय सुरू करावेत. तसेच छोटे छोटे उद्योगधंदे सुरू करावेत. उपलब्ध असलेल्या पाण्याचा काटकसरीने वापर करावा. जलसंवर्धन व उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर या बाबतीत व्यापक जनजागृती होणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.आर. टकले हे होते. प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याणकर पी.एम. यांनी सांगितला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन स्वयंसेविका दीपाली बोलकर हिने केले. आभार कु. सीमा जाधव हिने मानले.

**१.२ निबंध स्पर्धा : (विषय – मराठवाड्यातील दुष्काळ : कारणे व उपाययोजना)**

मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता व्हावी व दुष्काळ दूर करण्यासाठी त्यांची मते जाणून घेण्याच्या दृष्टीने विभागाच्या वतीने दि. १६ सप्टेंबर २०१९ रोजी "मराठवाड्यातील दुष्काळ : कारणे व उपाययोजना" या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या निबंध स्पर्धेत कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी व्हावेत यासाठी फुलंब्री गावातील कनिष्ठ महाविद्यालयांना कार्यक्रमाधिकारी डॉ. पांडुरंग कल्याणकर व श्री विनोद तुपे यांनी भेटी दिल्या होत्या.

या निबंध स्पर्धेत एकूण ३१ स्पर्धकांनी सहभाग घेतला. या निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या निबंधांचे परीक्षण प्रा. बाळासाहेब छबुराव लहाने (राज्यशास्त्र विभाग यांनी) केले. या स्पर्धेत कु. मृणाली मनोरकर हिने प्रथम क्रमांक मिळविला, तर कु. स्वाती मेहत्तर हिने द्वितीय क्रमांक मिळविला. या स्पर्धकांना विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेत डॉ. संजय मून यांच्या हस्ते अनुक्रमे रु. ३०० व रु. २०० बक्षीस देण्यात आले.

**१.३ विद्यापीठस्तरीय कार्यशाळेतील सहभाग :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य, कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवकांसाठी आयोजित केलेल्या कार्यशाळेत महाविद्यालयाने सहभाग घेतला.

विद्यापीठ स्तरीय विभागाने महाविद्यालयाच्या प्राचार्यांसाठी दिनांक १३/०८/२०१९ रोजी आयोजित कार्यशाळेत/बैठकीत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.आर. टकले यांनी सहभाग घेतला.

विभागाने महाविद्यालयांच्या कार्यक्रमाधिकाऱ्यांसाठी दि. २६ ऑगस्ट २०१९ रोजी आयोजित केलेल्या कार्यशाळेत महाविद्यालयाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याणकर पी.एम. हे सहभागी झाले.

आजीवन शिक्षण व विस्तार विभागाने महाविद्यालयाचे विद्यार्थी / स्वयंसेवकांसाठी दि. २८ ऑगस्ट २०१९ रोजी आयोजित केलेल्या कार्यशाळेत महाविद्यालयाने सोमीनाथ रहाने, राजू खराद, जयश्री वाघ व कु. दिपाली बोलकर हे स्वयंसेवक सहभागी झाले होते.

## २. समाजस्तरावरील उपक्रम

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये विभागाच्या वतीने दरेगाव (दरी) ता. फुलंब्री येथे समाजस्तरावरील उपक्रमांचे आयोजन केले, त्याचा अहवाल पुढीलप्रमाणे -

### २.१ शेती व्यवसायासंबंधी मार्गदर्शन

दि. १५ फेब्रुवारी २०२० रोजी दरेगाव (दरी), ता. फुलंब्री येथे शेती व्यवसायासंबंधीचे मार्गदर्शन सायंकाळी ७.०० ते ९.१५ यादरम्यान करण्यात आले.

यावेळी डोंगरगाव (कवाड) येथील अनुभवी शेतकरी श्री. बाबासाहेब डकले यांनी 'रेशीम शेती' या शेतीपूरक व्यवसायासंदर्भात मार्गदर्शन केले. गेल्या १४ वर्षांपासून ते स्वतः तर हा व्यवसाय करतातच, त्याचबरोबर गावातील अन्य शेतकऱ्यांनाही त्यांनी प्रवृत्त केले आहे. रेशीम शेतीसंदर्भात बोलताना ते म्हणाले की, यामध्ये तुतीची लागवड करीत असताना चांगल्या प्रकारचे बेणे व योग्य लागवड करावी. अळ्यांचे संगोपन करताना त्यांना वाढीच्या वेगवेगळ्या टप्प्यात योग्य तो पाला टाकावा. शेडचे बांधकाम करताना पूर्व-पश्चिम बांधल्यास शेडमधील वातावरणाचे व्यवस्थापन करणे सोपे जाते. कोष तयार झाल्यावर त्याची विक्री करताना सामूहिकपणे करावी, त्यामुळे चांगला दर मिळू शकेल. कर्नाटक राज्यातील बेंगलोर जवळील रामनगर येथे कोसल्याची मोठी बाजारपेठ आहे. त्या ठिकाणी प्रतवारी करून कोष नेल्यास चांगला दर मिळतो. कोष काढल्यानंतर शेड चांगल्यारीतीने स्वच्छ करावा. तसेच तुतीच्या झाडाचे योग्य संगोपन करावे जेणेकरून दुसरा लॉट लवकर घेता येतो.

शेतीसंबंधी पूरक व्यवसाय या विषयावर जी.बी. खंडागळे (निवृत्त कृषी साहाय्यक) यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी यावेळी मशरूम, शेळीपालन, दुग्धव्यवसाय इत्यादी व्यवसायांसंदर्भात माहिती दिली. तसेच शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांबरोबरच फळझाडांची लागवड करावी, जेणेकरून उत्पन्नात वाढ होईल असा सल्ला दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दरेगाव (दरी)चे पोलीस पाटील श्री. बाबुराव मालोदे होते. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याणकर पी.एम. यांनी कार्यक्रम घेण्यामागचा उद्देश सांगितला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. बाबासाहेब लहाने यांनी केले. पाहुण्यांचा परिचय श्री. अजय जाधव, सुविचार राहुल कनसांड याने सांगितला, तर आभार श्री. अमोल डकले यांनी मानले.

कार्यक्रमास दरेगाव (दरी)तील ४८ पुरुष व २० महिला हजर होत्या. कार्यक्रमास गावच्या सरपंच सौ. शोभाबाई बाजीराव मालोदे, श्री. धनाजी दुधे, नानाभाऊ मालोदे, श्री. मधुकर मालोदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## २.२ आरोग्य तपासणी व योग शिबीर

दि. २१ फेब्रुवारी २०२० रोजी महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने दरेगाव (दरी), ता. फुलंब्री येथे आरोग्य तपासणी व योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. विजय काथार (वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय फुलंब्री) हे होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दरेगाव (दरी) येथील ज्येष्ठ नागरिक श्री. शामराव मालोदे हे होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. विजय काथार म्हणाले की, योगाने व्यक्तीच्या मनाची ताकद वाढते. शरीर सुदृढ होते. सैरभैर झालेल्या मनाला स्थिर करण्यासाठी योग करणे गरजेचे आहे. व्यक्तीचे आरोग्य बिघडल्यास वैद्यकीय उपचाराने आपण त्याला ठीक करतो. तेव्हा रोग्याने निश्चितच वैद्यकीय सल्ला घ्यावा. परंतु नियमित योग केल्याने व्यक्तीचे शरीर, मन व आत्मा प्रसन्न राहील आणि व्यक्ती स्वस्थ होईल. अशाप्रकारे स्वस्थ व्यक्ती व समाज झाल्यास आरोग्य बिघडणार नाही व आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याची गरज भासणार नाही. आरोग्य शिबिराचे आयोजन करावे लागू नये यासाठी योग शिबिरांचे आयोजन करणे गरजेचे आहे.

या शिबिराच्या प्रास्ताविकात कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याणकर पी.एम. यांनी शिबिराच्या आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. राजू खरात या स्वयंसेवकाने केले तर आभार श्री. सखाराम मालोदे यांनी मानले.

यावेळी योग शिबिरात डॉ. विजय काथार यांनी सूक्ष्म व्यायाम घेतले ज्यात पायाचे व हाताचे सूक्ष्म व्यायाम घेतले. तर उभ्या योगासनात ताडासन, वृक्षासन हे प्रकार घेतले. प्राणायामात कपालभाती व भस्त्रिका हे प्राणायाम घेतले. या प्राणायाम शिबिरात दरेगाव (दरी)तील ज्येष्ठ नागरिकांसहित लहान मुलांनी सहभाग घेतला. योग शिबिरानंतर आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये डॉक्टरांनी या गावातील महिला, बालक व ज्येष्ठ नागरिक अशा ५५ रुग्णांची तपासणी केली.

या आरोग्य तपासणी व योग शिबिरास दरेगाव (दरी)च्या सरपंच सौ. शोभाताई भाजीराव मालोदे, पोलीस पाटील बाबूराव मालोदे, ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग दादा मालोदे व पांडुरंग मारोती मालोदे, शामराव मालोदे, सखाराम मालोदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. विनोद तुपे, श्री. जयराम जाधव व स्वयंसेवक राजू खरात यांचे सहकार्य लाभले.

## ३. विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा

महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या माध्यमातून दिनांक २९ व ३० जानेवारी २०२० या कालावधीत विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत दोन दिवसांत विविध सत्र घेण्यात आले.

**बुधवार दिनांक २९ जानेवारी २०२०**

### ३.१ उद्घाटन सत्र :

दि. २९ जानेवारी २०२० रोजी डॉ. संजय मून (संचालक, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागत) यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते म्हणाले की, आजीवन शिक्षण विभागाच्या माध्यमातून विद्यार्थी व समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले जातात. महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने मी का शिकतो? हे प्रथमतः स्वतःला विचारावे. स्वतःमध्ये रोजगारक्षमता निर्माण होण्यासाठी आपण शिकत असतो. त्यामुळे पुस्तकी ज्ञानाबरोबरच विविध कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करावीत असे मत त्यांनी मांडले.

उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. आर. टकले सर होते. शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये कौशल्यगुण विकसित करण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षण व्यवस्था चांगली असली पाहिजे असे मत त्यांनी मांडले.

या सत्रात सुरुवातीस प्रास्ताविकातून कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याणकर पी.एम. यांनी कार्यशाळेमागची भूमिका सांगितली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. महेश थोरात यांनी केले. प्रार्थना कु. हर्षदा खोंडे व कु. स्वाती ढोके यांनी म्हटली. सुविचार कु. अश्विनी मालोदे हिने सांगितला.

### ३.२ सत्र दुसरे : व्यक्तिमत्त्व विकास

दिनांक २९ जानेवारी २०२० रोजी 'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर दुसरे सत्र घेण्यात आले. या सत्रात डॉ. आनंद उबाळे (इंग्रजी विभाग, डॉ. बा.आं.म.वि. औरंगाबाद) हे प्रमुख मार्गदर्शक होते. तर प्रस्तुत महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभागाचे डॉ. दुर्गेश फुलवाडे हे अध्यक्ष होते.

यावेळी व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर बोलताना डॉ. आनंद उबाळे म्हणाले की, उद्योग जगताने व्यक्तिमत्त्व विकास ही संकल्पना विकसित केली. त्यासाठी वेगवेगळे क्लासेस सुद्धा निघाले आहेत. व्यक्ती स्वतःचे व्यक्तिमत्त्व टिकवण्यासाठी निसर्गाच्या विरुद्ध जात आहे. इतर प्राणी मात्र निसर्गाच्या विरुद्ध जात नाहीत. आपणास अधिक पगार मिळाल्यानेच आपण सुखी जीवन जगणार आहोत का? याचा विचार करावा. जो व्यक्ती नवनिर्मिती करतो त्यातून त्याला आनंद मिळतो व त्यातून तो सुखी जीवन जगू शकतो. व्यक्तीने समाजाचे जीवन अधिक सुखी करणाऱ्या नवनिर्मितीसाठी प्रयत्न करावेत.

### ३.३ सत्र तिसरे : लेखन व संभाषण कौशल्य

या कार्यशाळेच्या पहिल्या दिवशीच्या तिसऱ्या सत्रात 'लेखन व संभाषण कौशल्य' या विषयावर डॉ. कैलास इंगळे यांनी मार्गदर्शन केले. तर या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. अश्विन रांजणीकर हे होते.

लेखन व संभाषण कौशल्य आत्मसात असलेल्या व्यक्तीला अधिक संधी आहेत. संभाषणातून तो दुभाषकाचे काम करू शकतो. लेखन प्रक्रियेतून तो भाषांतरकार म्हणून काम करू शकतो. ज्याची निवेदनशैली चांगली असेल तो निवेदक म्हणून काम करू शकतो. परंतु या सर्वांसाठी गरज आहे ती स्वतःला ओळखण्याची. आपल्यामधील गुणांचा विकास करण्याची. विद्यार्थ्यांनी वाचन, लेखन व श्रवणातून आपले गुण विकसित करावेत, असे मत त्यांनी मांडले.

या सत्राचे सूत्रसंचलन कु. मानसी पवार हिने केले तर आभार डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी मानले. या कार्यशाळेत पहिल्या दिवशी ७८ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

**गुरूवार दिनांक ३० जानेवारी २०२०**

### ३.४ सत्र चौथे : बँकींग व शासकीय क्षेत्रातील रोजगार संधी

विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी 'बँकींग व शासकीय क्षेत्रातील रोजगार संधी' या विषयावर प्रा. संतोष बोरडे (बोरडे करिअर अॅकॅडमी, औरंगाबाद) यांनी मार्गदर्शन केले तर सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. महेश थोरात (वाणिज्य विभाग, प्रस्तुत महाविद्यालय) हे होते. यावेळी ते म्हणाले की,

ग्रामीण भागातील युवकांमध्ये बँकींग परीक्षेबाबत भीती असल्याने ते पोलीस भरती, ग्रामसेवक यापुढे जाऊन विचार करू शकत नाहीत. परंतु बँकींग परीक्षा कोणत्याही शाखेतील विद्यार्थी देऊ शकतो. यावेळी त्यांनी बँकींग परीक्षेसाठी असलेल्या अभ्यासक्रम व त्यासाठी कोणती पुस्तके वाचायची यासंदर्भात माहिती दिली.

## ३.५ सत्र पाचवे : उद्योजकीय गुणांचा विकास

दुसऱ्या दिवशी पाचव्या सत्रात 'उद्योजकीय गुणांचा विकास' या विषयावर श्री. सुहास भोगे (सीईओ ॲण्ड डायरेक्टर, मेश्रखेल टेक्नोव्हीजन प्रा. लि.) यांनी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांसमोर स्वतःचा उद्योजकीय क्षेत्रातील प्रगतीचा अहवाल डोळ्यांसमोर ठेवला. त्यांनी बजाजमध्ये विविध पदांवर केलेल्या कामाचे अनुभव सांगितले. परंतु एक दिवस आपली बुद्धी इतरांसाठी वापरण्याऐवजी स्वतःच्या विकासासाठी वापरण्याचे ठरवले. त्यातून ते गुणवत्ता तपासणी उद्योजकाकडे वळले. आज त्यांची वार्षिक उलाढाल ६ ते ७ कोटी रुपयांची आहे. त्यांच्या उद्योजकाने आज हेलीकॉप्टरच्या गुणवत्ता तपासणीपर्यंत वाटचाल केल्याचे त्यांनी सांगितले. भारत-जर्मन करारानुसार जर्मनीत एक महिना प्रशिक्षणासाठी भारतातून पाठवण्यात आलेल्या २० उद्योजकांमध्ये त्यांचा समावेश होता. उद्योग हा व्यक्तीच्या डोक्यात व पोटात पाहिले. विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन करावे, इंग्रजीमध्ये संवाद करावा, पुस्तकांचे वाचन करावे व स्वतःच्या शब्दांचा आदर करावा, असा सल्ला दिला.

या सत्राच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. बाबासाहेब लहाने यांनी केले तर आभार डॉ. कल्याणकर पी.एम. यांनी मानले.

## ३.६ समारोप सत्र : करिअर मार्गदर्शन

कार्यशाळेच्या समारोप सत्रात 'करिअर मार्गदर्शन' या विषयावर श्री. गजानन हरकळ (सहशिक्षक, स्वामी विवेकानंद विद्यालय, चिंचोलीपिंपळगाव) यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. विजय पांडे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. करिअर मार्गदर्शन या विषयावर मार्गदर्शन करताना श्री. गजानन हरकळ यांनी महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या विविध पदांच्या बाबतीत, अभ्यासक्रमाच्या बाबतीत माहिती दिली व त्यासाठी विविध पातळ्यावरील परीक्षांच्या तयारीबाबत मार्गदर्शन केले. महाविद्यालयात पदवीसाठी प्रवेश घेतल्यापासूनच विद्यार्थ्यांनी कोणत्या पदासाठी आपणास तयारी करायची हे ठरवावे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कु. मानसी पवार हिने केले, तर आभार श्री. अमोल डकले या स्वयंसेवकाने मानले. कार्यशाळेत दुसऱ्या दिवशी ७५ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

## ४. स्वयंनिर्वाही प्रमाणपत्र अभ्यासक्रम (Self Finance Certificate Courses)

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद महाविद्यालयास मंजूर केलेल्या अभ्यासक्रमांपैकी विक्री प्रतिनिधी या अभ्यासक्रमास ३५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या अभ्यासक्रमाचे समन्वयक म्हणून महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेचे डॉ. महेश थोरात व प्रा. नितीन माळेगावकर यांनी काम पाहिले.

| | |
|---|---|
| **कार्यक्रमाधिकारी** | **प्राचार्य** |
| **प्रा. डॉ. पी.एम. कल्याणकर** | **डॉ. एस.आर. टकले** |

Pandit Dindayal Upadhaya Education Society's

SHRI SANT SAVTA MALI GRAMIN MAHAVIDYALAYA, PHULAMBRI,

Tq. Phulambri, Dist. Aurangabad

Affiliated to

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

# Department of Lifelong Learning and Extension

# Annual Report

# 2019 - 2020

**Principal**

**Dr. S. R. Takle**

**Programme Officer**

**Dr. Kalyankar P.M.**

Pandit Dindayal Upadhaya Education Society's

# Shri Sant Savta Mali Gramin Mahavidyalaya, Phulambri

Tq. Phulambri, Dist. Aurangabad

# Lifelong Learning and Extension Department

## Annual Report

## 2019 - 2020

Lifelong Learning and Extension Department of Shri Sant Savta Mali Garamin Mahavidyalaya, Phualmabri has been organized various programme at Community level and College level during 2019-20. Department has also taken two days Students Counseling and Career Guidance workshop. As well as during this year department has also run One Self Finance Certificate Course.

1) **Extension Activity at College Level:**
   This department has organized following programme on college level during 2019-2020

**1.1) Special Lecturer on Drought in Marathwada Region :**

Department has organized Special lecture on Drought situation in Marathwada Region on 23rd August 2019 on the occasion of University Foundation Day. Dr. Sachin More ( Rajarshi Shau Mahavidyalaya, Pathri ) was the speaker of this programme. He pointed out that there are two types of draught, one is dry drought and another is wait drought situation. Marathwada region is mostly facing dry drought situation. He pointed out that Geographical Location of Marathwada is also reason for drought.

India gets its rains due to the southwest monsoon. The clouds draw water from the Indian Ocean, and deposit it on land. When southwest monsoon reaches Maharashtra, it is first greeted by the Sahyadri mountain ranges. Due to these ranges, there is heavy rainfall in the coastal region of Maharashtra — Konkan. When the monsoon crosses the Sahyadris, it enters the rain shadow region, which is the western Maharashtra belt. It receives less rainfall compared to coastal Maharashtra. Then, the rainfall decreases by the time the monsoon reaches Marathwada. He suggested that farmers must adopt Agro based business to tackle the drought situation.

Concluding remark of programme made by Principal. Dr. S. R. Takle. Introductory speech given by Dr. Kalyankar P.M., volunteer Deepali Bolkar has anchored the programme and Seema Jadhav delivered gratitude of this programme.

## 1.2) Essay Competitions On "Drought In Mararthwada: Causes and Consequences" :

Lifelong Department has organized Essay competitions on 16th September 2019 on Drought in Marathwada: Causes and Consequences. The object of this competition is to create awareness about drought among the college students and know there views on drought. The Students of Junior colleges in the Phulambri city, are also invited for this competition by Dr. Kalyankar P.M. and Mr. Vinod Tupe.

There are 31 students are involved in this essay competitions. Shri Babasaheb Lahane ( Assistant Professor, Political Science) has worked as examiner of this essay competitions. Mranali Maonorkar has won first prize worth Rs. 300 and Swati Mehattar has won second prize worth Rs. 200 of this essay competition. Prize has been distributed through the hands of Dr. Sanjay Moon on the occasion of inaugural function of Students Counseling and Career Guidance Workshop on 29 January 2020.

## 1.6) Participation in University Level Training Programmes:

Department of Lifelong Learning and Extension of Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad arranged training programme for Principal, Programme Officers, Volunteers on following dates our collage participation in those training programme were follow:

| Sr. No. | Training Programme | Date | Participant |
|---|---|---|---|
| 01 | For College Principal | 13/08/2019 | Principal, Dr.S.R.Takle |
| 02 | For Programme Officers | 26/08/2019 | Dr. Kalyankar P.M. |
| 03 | For Volunteers | 28/08/2019 | Jayshri Wagh (BASY)<br>Sominath Adhane(BATY)<br>Dipali Bolkar (BATY)<br>Raju Kharat (BATY) |

College programme Officer Dr. P.M. Kalyankar also attended various meeting arranged by Department of Lifelong Learning and Extension of Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad in academic year 2019-2020

## 2) Extension Activity at Community Level:

College Lifelong Learning and Extension Department has organized Community level programme in Dargaon Dari, Tq. Phulambri in academic year 2019-2020.

### 2.1) Arranged Lecturer on Guidance about Agriculture Based Business:

Lifelong Department has arranged lecturer at Dargaon Dari on Agricultur Based Business at Dargaon Dari on 15th February 2020. Shri Babasaheb Dakle, Shri J.B. Khandagle were speaker of this programme. Shri Baburao Malode has chaired this programme.

In this programme Shri Babasaheb Dakle who has 14 years' experience of sericulture farming has guide about Sericulture Farming. He has explained the various stages of Sericulture farming from planting the Mulberry plants to selling of Cocoon in the market. He told that Sericulture farming is generating income regularly.

Shri J.B. Khandagle (Retired Agriculture servant and progressive farmer and delivered various speeches on All India Radio) has guided about the various Agriculture Based Business like Dairy farming , Poultry Farming, Mushroom Farming , Preparation of Vermicomposting. He suggest that farmers most adopt fruits farming instead of totally dependents on traditional crops.

Programme officer Dr. P.M. Kalyankar has introduced this programme. Shri Babasaheb Lahane has anchored this programme. Volunteer Ajay Jadhav has introduced the speakers of this programme, Rahul Bansod has told good thought in this programme , and Amol Dakle delivered gratitude of this programme. Sarpanch Shobatayee Malode, Danaji Dudhe, Nanbhau Malode , Madukar Malode etc. are the main presenters of this programme.

### 2.3) Health Checkup and Yoga Camp : (Arranged Lecture at Dargaon ( Dari)) :

Health checkup and Yoga Camp has been arranged at Dargaon (Dari ) on 21st February 2020. Dr. Vijay Kathar( Medical Officer, Rural Hospital, Phulambri) is trainer and doctor for Health checkup and Yoga Camp.

Dr. Vijay Kathar told that yoga is helpful to develop strong body, mind and soul of human. Health checkup camps are helpful diagnosis and cure the diseases.

but the Yoga is help to avoid the human from various diseases. Dr. Vijay Kathar has taught various Asan and parnayam to the villagers in the Yoga camp. Health checkup camp has organized after the yoga camp. Dr. Kathar has checkup 55 patients in this health checkup camp mostly the patients were woman, old persons and children's of Dargaon Dari.

This camp has been chaired by Shri Shamrao Malode. Dr. P.M. Kalyankar has introduced the programme. Volunteers Shri Raju Kahrat has anchored the programme.

Sarpanch Shobha Malode, Baburao Malode, Pandurang Dada Malode, Pandurang Maroti Malode, Skharm Malode and may villagers of Daregaon Dari are presented for this camp. Vinod Tupe and Jayram Jadhav have helped for smooth conditions of this programme.

## 3) Student Counseling and Carrier Guidance Camp

Department had organized two days' workshop on 29th and 30th January 2020. The workshop was on Student Counseling and Carrier Guidance. Following session were conducted during the two days' workshop as such

**Date: Wednesdays, 29th January 2020**

### 3.1 Inaugural Function:

Student council and career guidance workshop has been inaugurated by Dr. Sanjay Moon (Director of Lifelong learning & Extension, Dr. B.A.M.U, ABAD). On this occasion he told that Lifelong department is working for solve the social and students problem. He suggested every student who is studying on college level must ask himself, that why is he taking education? We are learning to develop employability within ourselves, to develop employability within themselves students must adopts various skills along with to complete their syllabus.

The session was chaired by the Principal Dr. S.R. Takle, he focus on development of quality surrounding in education institutes campus. Program introduced by Dr. P.M. Kalyankar. This session has been anchored by Dr. Mahesh Thorat, Prayer has been song by Harshda Khonde and Swati Dhoke, good thoughts told by Ashwini Malode. Dr. Anand Ubale, Dr. Kailas Ingale are also presented for this programme.

### 3.2 Second Session: Personality Development:

Second session of this workshop was on the personality development and Dr. Anand Ubale (Department of English, Dr. BAMU) was main speaker of this session. Dr. Durgesh Phulwade (Zoology Department) has chaired this session .

Dr. Anand Ubale told that, "The concept of personality development has been developed by industrialist and various classes have been started for personality development. Human being is working against the nature for development of his personality. But other animals are coexisting with nature. All Human being must have think that, Are we all live happy life only by generating more income and getting high salary? He also told that human are live happy life through innovation. Student must try for innovation which is help for more comfortable life of common man.

### 3.3 Third Session: Writing & Communicative Skill

The third session of this workshop was on Writing and Communicative Skill. Dr. Kailas Ingale (Dept. of Marathi, Rajshri shahu Mahavidyalaya, Pathri) was main speaker of this session chaired by Dr. Ashwin Ranjanikar (Dept. English). Dr. Kailas Ingale told that, there are number of opportunities to the person who have writing and communication skills, like interpreter, translator, anchor of the programme. Every person must try to know himself and develop his skills.

This session has been anchored by Mansi Pawar. Dr. Sajivkumar Panchal has gratitude the all session of the first day.

There are 78 students has participated in the first day of workshop.

**Date: Thursday, 30th January 2020**

### 3.4 Fourth Session: Job opportunity in Banking and Government sector

Fourth session of Student Counseling and Carrier Guidance was on second day topic of this session was Job opportunity in Banking and Government sector. Shri. Santosh Borde (Director, Borde Carrier Academy, Aurangabad) was main speaker and session chaired by Dr. Mahesh Thorat (Dept. of Commerce). In this session Borde sir told that rural youth are afraid about banking examination. So their trends is towards the Police, Gramsevak examination and they are not thinking beyond that sectors. He told that any faculty graduate students can face banking examination. He also explain the syllabus of banking examinations and books for that.

### 3.4 Fifth Session: Entrepreneurship development

Fifth session of Student Counseling and Carrier Guidance was on Entrepreneurship development Shri. Suhas Bhoge (CEO and Director, Measurewel Techno vision, Pvt, Ltd.) and session has been chaired by Principal, Dr. S. R. Takle. Shri. Bhoge has express his own development in industrial sector in front of students.

He also expresses his own experience as a servant in Bajaj Industry on various posts. But one day he thinks that how may days he works for another and he think to start quality checkup industry. Now days His industry turnover is near about six to seven crore rupees. His industry is not only checking the quality of any part of motor vehicle but also he also checkup quality of helicopters. He also involved among 20 young industrialist of India who are participated in Young Industrialist training programme, arranged in Germany by bilateral agreements of India and Germany governments.

He suggest that students must manage their time, they try to communicate in English, vast books reading and respect their own words. This session has been anchored by Assistant Prof. Babasaheb Lahane and session has been gratitude by Dr. P. M. Kalyankar.

### 3.6 Sixth Session: Valedictory Session – Carrier Guidance

The sixth and valedictory session of this workshop was on carrier guidance. Shri Gajana Harkal is main speaker of this session. Session has been chaired by Associate Prof. Vijay Pande. Shri. Harkal sir has explain about the various examination arranged by Maharashtra State Public Service Commission. He also explained the syllabus and how to prepare for these examinations. He suggest that students must prepare for various post from the first year of graduation. This session has been anchored by Mansi Pawar and session has been gratitude by Shri. Amol Dakle.

There are 75 students participated in the second day of workshop.

## 4. Implementation Self-financed Certificate Course:

Lifelong Learning and Extension department has run **Sales Representative** Self-financed Certificate Courses in academic year 2019 - 2020 . There are 35 students have been taken admission for this course. Dr. Mahesh Thorat and Assistant Prof. Nitin Malegaonkar are coordinators of this Course.

**Programme Officer**
Dr.P.M. Kalyankar

**Principal**
Dr. S.R.Takle

# कृतीयुक्त फोटो अहवाल

## महाविद्यालय स्तरावरील कार्यक्रम




दि. 23 ऑगस्ट 2019 रोजी आयोजित कार्यक्रमात प्रार्थना म्हणताना दिपाली बोलकर व मानसी पवार



"मराठवाड्यातील दुष्काळ" या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. कल्याणकर पी. एम.




"मराठवाड्यातील दुष्काळ" या विषयावर बोलताना डॉ. सचिन मोरे व्यासपिठावर प्राचार्य डॉ. एस. आर. टकले



"मराठवाड्यातील दुष्काळ" या विषयावर बोलताना डॉ. सचिन मोरे व्यासपिठावर प्राचार्य डॉ. एस. आर. टकले



"मराठवाड्यातील दुष्काळ" या विषयावर आयोजित व्याख्यानाचा अध्यक्षीय समारोप करताना
प्राचार्य डॉ. एस. आर. टकले

## समाजस्तरावरील उपक्रम



दि. 15 फेब्रुवारी 2020 रोजी दरेगाव (दरी) येथे आयोजित कार्यक्रमाचे सुत्रसंचलन करताना श्री. बाबासाहेब लहाने



शेती व्यवसाय संबंधी मार्गदर्शन करताना श्री. बाबासाहेब डकले




शेती व्यवसाय संबंधी मार्गदर्शन कार्यक्रमात रेशीम शेतीसंबंधी मार्गदर्शन करताना श्री. बाबासाहेब डकले,
व्यासपिठावर श्री. जी. बी. खंडागळे, श्री. बाबुराव मालोदे (पो. पाटील), डॉ. कल्याणकर पी. एम.



"शेती व्यवसायासंबंधी मार्गदर्शन" या कार्यक्रमात शेतीपुरक व्यवसायासंबंधी मार्गदर्शन
करतांना श्री. जी. बी. खंडागळे




"शेती व्यवसायासंबंधी मार्गदर्शन" या कार्यक्रमात शेतीपूरक व्यवसायासंबंधी मार्गदर्शन करतांना श्री. जी. बी. खंडागळे

---




दरेगाव (दरी) येथे आयोजित कार्यक्रमाचे आभार मानताना स्वंयसेवक श्री. अमोल ढकले



दि. 21 फेब्रुवारी 2020 रोजी दरेगाव (दरी) येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन करतांना स्वंयसेवक राजू खरात



दरेगाव (दरी) येथे आयोजित केलेल्या आरोग्य तपासणी व योग शिबिराचे प्रास्ताविक करताना डॉ. कल्याणकर पी. एम.



आरोग्य तपासणी व योग शिबिरात मार्गदर्शन करताना डॉ. विजय काथार, व्यासपिठावर श्री. पांडुरंग मालोदे, डॉ. कल्याणकर पी. एस. श्री. शामराव मालोदे



योग शिबिरात सूक्ष्म व्यायाम शिकवताना डॉ. विजय काथार



योग शिबिरात स्कंध संचालन शिकवताना डॉ. विजय काथार



योग शिबिरात आसन शिकवताना डॉ. विजय काथार



योग शिबिरात ताडासन शिकवताना डॉ. विजय काथार



योग शिबिरात विरासन शिकवताना डॉ. विजय काथार, व्यासपिठावर डॉ. कल्याणकर पी. एम. व दरेगाव (दरी) चे ग्रामस्थ



दरेगाव (दरी) येथे आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात आरोग्य तपासणी करतांना डॉ. विजय काथार




आरोग्य तपासणी शिबिरात आरोग्य तपासणी करतांना डॉ. विजय काथार, व्यासपिठावर डॉ. कल्याणकर पी. एम.



आरोग्य तपासणी शिबिरात आरोग्य तपासणी करतांना डॉ. विजय काथार व रांगेत उभे ग्रामस्थ



आरोग्य तपासणी शिबिरात वृद्ध महिलेची तपासणी करतांना डॉ. विजय काथार, व्यासपिठावर डॉ. कल्याणकर पी. एम.




आरोग्य तपासणी शिबिरात वृद्ध महिलेची तपासणी करतांना डॉ. विजय काथार, व्यासपिठावर डॉ. कल्याणकर पी. एम.




आरोग्य तपासणी शिबिरात वृद्ध महिलेची तपासणी करतांना डॉ. विजय काथार, व्यासपिठावर डॉ. कल्याणकर पी. एम.




आरोग्य तपासणी शिबिरात वृद्ध महिलेची तपासणी करतांना डॉ. विजय काथार, व्यासपिठावर डॉ. कल्याणकर पी. एम.




आरोग्य तपासणी शिबिरात वृद्ध व्यक्तीची तपासणी करतांना डॉ. विजय काथार, व्यासपिठावर डॉ. कल्याणकर पी. एम.

# विद्यार्थी सुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा



विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे दीपप्रज्वलीत करुन उद्घाटन करतांना डॉ. संजय नून, प्राचार्य डॉ. एस. आर. टकले, डॉ. कैलास इंगळे, डॉ. आनंद उबाळे, डॉ. कल्याणकर पी. एन.



प्रार्थना म्हणताना स्वंयसेविका कु. हर्षदा खोंडे, कु. स्वेता ढोके



विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे प्रास्ताविक करतांना कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याणकर पी. एम.



विभागाने आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक आलेल्या कु. स्वाती मेहत्तर हिचा सत्कार करतांना डॉ. संजय मून



निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक आलेल्या कु. मृणाली मनोरकर हिचा सत्कार करतांना डॉ. संजय मून



विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. संजय मून, व्यासपिठावर डॉ. कैलास इंगळे, डॉ. आनंद उबाळे, प्राचार्य डॉ. एस. आर. टकले




विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना
डॉ. संजय मून



कार्यशाळेत दि. 29 जानेवारी 2020 रोजी सहभागी स्वंयसेविका व स्वंयसेवक



विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाचा अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. एस. आर. टकले



"विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेत व्यक्तीमत्त्व विकास" या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. आनंद उबाळे, व्यासपिठावर डॉ. कैलास इंगळे, डॉ. संजय मून, डॉ. दुर्गेश फुलवाडे, डॉ. अश्विन रांजणीकर, राहूल सरोते



व्यक्तीमत्त्व विकास या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. आनंद उबाळे



विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेत लेखन व संभाषन कौशल्य या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. कैलास इंगळे



कार्यशाळेच्या पहिल्या दिवसाचे आभार मानतांना डॉ. संजिवकुमार पांचाळ



कार्यशाळेत दि. 30 जानेवारी 2020 रोजी महात्मा गांधी पुण्यतिथी निमित्त दोन मिनिटे शांतता बाळगुण त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.



श्रद्धांजली वाहतांना प्राचार्य डॉ. एस. आर. टकले, प्रा. संतोष बोरडे, डॉ. महेश थोरात



दि. 30 जानेवारी 2020 रोजी बँकिंग व शासकीय क्षेत्रातील रोजगार संधी या विषयावर मार्गदर्शन करतांना प्रा. संतोष बोरडे



कार्यशाळेत मार्गदर्शकांना प्रश्न विचारतांना स्वंयसेविका



बँकिंग व शासकीय क्षेत्रातील रोजगार संधी या सत्राचा अध्यक्षीय समारोप करतांना
डॉ. महेश थोरात



कार्यशाळेत श्री. सुहास भोगे यांचा परिचय करून देतांना प्रा. नितीन मालेगावकर



"उद्योजकीय गुणांचा विकास" या विषयावर मार्गदर्शन करतांना श्री. सुहास भोगे (सीइओ ॲण्ड डायरेक्टर, मेझरवेल टेक्नो व्हिजन प्रा. लि.) व्यासपिठावर प्राचार्य डॉ. एस. आर. टकले



"उद्योजकीय गुणांचा विकास" या विषयावर मार्गदर्शन करतांना श्री. सुहास भोगे (सीइओ ॲण्ड डायरेक्टर, मेझरवेल टेक्नो व्हिजन प्रा. लि.) व्यासपिठावर प्राचार्य डॉ. एस. आर. टकले



कार्यशाळेत दि. 30 जानेवारी 2020 रोजी लाभलेला प्रतिसाद



कार्यशाळेच्या पाचव्या सत्राचे आभार मानतांना कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याणकर पी. एम.



करिअर मार्गदर्शन या विषयावर मार्गदर्शन करतांना श्री. गजानन हरकळ, व्यासपिठावर सत्राचे अध्यक्ष प्रा. विजय पांडे, डॉ. पी. एम. कल्याणकर, प्रा. बाबासाहेब लहाने



करिअर मार्गदर्शन सत्राचा अध्यक्षीय समारोप करतांना प्रा. विजय पांडे

# Lifelong Learning and Extension Department


## Publicity 2019-2020

# सकाळ

सकाळ

# दुष्काळ निवारणासाठी शेतीपूरक उद्योगांची सुरवात करा

## सचिन मोरे : फुलंब्री येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा वर्धापनदिन साजरा



...त ट्रॅव्हल्स

...रनगीर/ कुलू-मनाली/ ...का/ दार्जिलिंग, गंगटोक/ ...ि/ आसाम मेघालय ...पुत्रम/ श्रीलंका/ थाईलंड ...गुरु राजा नेवाज, ...लेस न 1, ...नपूर. फोन (0712) मो. 9373280715 ...01/20 to 10/04/20

...विक उपचार

...B.A.M.S. MD, M.B.B.S. MD. ...

...कांसाठी सूचना

...ा सर्व वाचकांना ...ला पैसे की, कोणत्याही ...रपूर्वतः विश्वास ठेवून ...व्यवहार किंवा कोणतीही ...रण करण्याआधी ...ची सत्यता व कंपनीची ...ची तपासून पाहावी. ...आर्थिक किंवा इतर ...फसवणूक झाल्यास ...साठी समूह जबाबदार ...नाही. याची वाचकांनी ...

...जाहिरात व्यवस्थापक


# शेतकऱ्यांनी चांगल्या उत्पादनासाठी शेतीपूरक व्यवसायाकडे लक्ष द्यावे - जी.बी.खंडागळे



तालुका प्रतिनिधी / १९ फेब्रुवारी

पुर्णा : शेतकऱ्यांनी पारंपारिक शेती करत असताना चांगल्या उत्पादनासाठी शेतीपूरक व्यवसायाकडे लक्ष द्यावे यासाठी रेशीम शेती, मशरूम, शेळीपालन, दुग्ध व्यवसाय आदींचा वापर करून आपले उत्पादन वाढवावे असे प्रतिपादन जी. बी. खंडागळे यांनी केले.

ते शहरातील संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात आजीवन शिक्षण विस्तार विभागाच्या वतीने दरेगाव दरी येथे शेती व्यवसायासंबंधी मार्गदर्शनासाठी आयोजन करण्यात आले होते. यावेळी डोंगरगाव मजाळ येथील शेतकरी बाबासाहेब कमले यांनी 'रेशीम शेती' तर जी.बी. खंडागळे (निवृत्त कृषी सहाय्यक) यांनी 'शेतीसंबंधी पूरक व्यवसाय' विषयावर मार्गदर्शन केले.

या व्यवसायासाठी उपस्थित शेतकऱ्यांना त्यांनी प्रवृत्त केले. रेशीम शेती करताना तुतीची लागवड योग्य प्रकारच्या रोपांनी व्यवस्थित करावी व अळ्यांच्या संगोपनासाठी योग्य तो पाला टाकावा म्हणजे रेशीम उत्पादन चांगल्या प्रकारे होईल व शेतकऱ्यांना चांगला नफा मिळवता येईल. यासाठी शेडची रचना कशी असावी, यासंबंधी माहिती दिली. ही शेती सामूहिकपणे करून तयार झालेल्या कोषांची विक्री सामूहिकपणे करावी म्हणजे दर चांगला मिळेल. तसेच या उत्पादन विक्रीच्या बाजारपेठेसंबंधी माहिती दिली. यावेळी बापूराव मालोदे, सरपंच सौ.भाताई बळीराम मालोदे, धनाजी दुधे, भाभाभाई मालोदे, मधुकर मालोदे, यांची प्रमुख उपस्थिती होती.


Thu, 20 February 2020
https://deshonnati.digitaledition.in/c/4929776

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संलग्नित
व
पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री.

## आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग

## विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा

**दिनांक : २९ व ३० जानेवारी २०२०**

## निमंत्रण पत्रिका

श्री / श्रीमती ______________________________

आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने दि.२९ व ३० जानेवारी २०२० या कालावधीत दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी आपण या कार्यशाळेत सहभागी व्हावे ही विनंती.

### कार्यशाळेतील उपक्रम

**बुधवार, दिनांक २९ जानेवारी २०२०**

सत्र पहिले
उद्घाटन सत्र :- वेळ : सकाळी ११:०० ते १२:३०
**उद्घाटक व बीजभाषक :- डॉ. संजय मून**
(संचालक, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, डॉ.बा.आं.म.वि.)
**अध्यक्ष :- प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले**

सत्र दुसरे :- वेळ १२:३० ते २:००
विषय : व्यक्तिमत्व विकास
**वक्ते :- डॉ. आनंद उबाळे**
(इंग्रजी विभाग, डॉ.बा.आं.म.वि.)
**अध्यक्ष :- प्रा. दुर्गेश फुलवाडे**
(प्राणीशास्त्र विभाग, प्रस्तुत महाविद्यालय)

अल्पोपहार २:०० ते २:३०

सत्र तिसरे :- वेळ: २:३० ते ४:००
विषय : लेखन व संभाषण कौशल्य
**वक्ते :- डॉ. कैलास इंगळे**
(मराठी विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री)
**अध्यक्ष :- डॉ. आश्विन रांजणीकर**

**गुरुवार, दिनांक ३० जानेवारी २०२०**

सत्र चौथे :- वेळ: ११.०० ते १२.३०
विषय :- बँकींग व शासकीय क्षेत्रातील रोजगार संधी
**वक्ते :- प्रा. संतोष बोरडे**
(बोरडे करीअर अकॅडमी, औरंगाबाद)
**अध्यक्ष :- डॉ. महेश थोरात**

सत्र पाचवे :- वेळ:१२.३० ते २:००
विषय :- उद्योजकीय गुणांचा विकास
**वक्ते :- श्री. सुहास भोगे**
(मीडिया अँड ब्रॉडकास्टर, मेसर्स टेक्नोलॉजीज प्रा.लि.)
**वक्ते :- श्री. के. व्ही. नागराज**
(उपव्यवस्थापक, एसबीएम)
**अध्यक्ष :- श्री. अनिल दुतोंडे**
(गणेश तेल इंडस्ट्री, फुलंब्री)

अल्पोपहार २.०० ते २.३०

समारोप सत्र :- वेळ २:३० ते ३:३०
विषय: करिअर मार्गदर्शन
**वक्ते :- श्री गजानन हक्काळ**
**अध्यक्ष :- प्रा. विजय गाडे**

**विनित**

| | | |
|---|---|---|
| कार्यक्रमाधिकारी<br>डॉ. पी. एम. कल्याणकर<br>९५४५८९१४८४, ८८३०५२७३२७ | सर्व प्राध्यापक व कर्मचारी | प्राचार्य<br>डॉ. एस. आर. टकले |